## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :५०२/२०२२/धुळे**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. दिलीप शंकर पवार,<br>रा. प्लॉट नं.३, विद्याविहार कॉलनी, संत नरहरी मराठी शाळेलगत, साक्री रोड,<br>धुळे, ता. जि. धुळे. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, लामकानी,<br>ता. जि. धुळे. |

**सुनावणी दिनांक २५/०६/२०२४**

तक्रारदार यांनी दिनांक ०५/०९/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक २५/०६/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार उपस्थित आणि संबंधित जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक. ०५/०९/२०२२ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश होवूनही प्राप्त झालेली नाही. व गट विकास अधिकारी यांनीही आजतागायत काहीएक कार्यवाही केलेली नाही. जन माहिती अधिकाऱ्यांविरुध्द शास्तीची कारवाई व्हावी.

३) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. ६५२/२०१९/धुळे वरील निर्णय दिनांक १५/०३/२०२१ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, श्री. एच.बी. मोरे यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६/११/२०१८ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी.

४) सुनावणीपुर्वी प्रस्तुतच्या तक्रार अर्जासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून मागविण्यात आलेला अहवाल अद्यापही प्राप्त झालेला नाही. तसेच सुनावणीसाठी संबंधित जन माहिती अधिकारी उपस्थित असले तरीही त्यांनी कोणताही अहवाल सादर केलेला नाही. त्यामुळे या तक्रारीची वस्तुस्थिती आयोगाच्या निदर्शनास आलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. ६५२/२०१९/धुळे मध्ये दिनांक १५/०३/२०२१ रोजी पारीत केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

२) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. ६५२/२०१९/धुळे मध्ये दिनांक १५/०३/२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशाचे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, श्री. एस.बी. मोरे यांनी पालन केले नाही. म्हणुन त्यांचे विरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी

तात्काळ आयोगास सादर करावा. त्यांचा लेखी खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

३) वरील आदेशांसह प्रस्तुत तक्रार क्रमांक ५०२/२०२२/धुळे निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रत — माहिती आणि आवश्यक कार्यवाहीसाठी

गटविकास अधिकारी, पंचायत समिती, धुळे, ता. जि. धुळे.

यांना कळविण्यात येते की, आयोगाने पारित केलेल्या आदेशाची प्रत संबंधितांना बजावून आयोगाकडे लेखी खुलासा सादर करण्याबाबत आपल्या स्तरावरुन योग्य त्या सूचना द्याव्यात.

जावक क्र ९८२८ 10 MAR 2025